आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१९ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- देशाच्या अन्न उद्योगात नवोन्मेष, शाश्वतता आणि सुरक्षिततेचे जागतिक मानक स्थापन करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत ‘स्वच्छता ही सेवा’ या राज्यस्तरीय अभियानाची सुरुवात

- अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून ४ वर्षानंतर पहिल्यांदाच व्याजदरात कपात, जगभरातले शेअर बाजार तेजीत

**आणि**

- बांगलादेशविरुद्धच्या क्रिकेट कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारताची खराब सुरुवात

**<><><><><>**

देशाच्या अन्न उद्योगात नवोन्मेष, शाश्वतता आणि सुरक्षिततेचे जागतिक मानक स्थापन करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित वर्ल्ड फूड इंडिया २०२४ परिषदेला आज पहिल्या दिवशी त्यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं. प्रगतीशील कृषी पद्धती, भक्कम प्रशासकीय यंत्रणा आणि आधुनिक तंत्रज्ञान याद्वारे खाद्य प्रक्रिया क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व्यापक सुधारणा

सुरू केल्या असल्याचं ते म्हणाले. अन्न प्रक्रिया क्षेत्रात १०० टक्के थेट परदेशी गुंतवणूक, प्रधानमंत्री किसान संपदा योजना आणि खाद्यप्रक्रिया उद्योगांसाठी प्रोत्साहन योजना यासारख्या उपक्रमांचा उल्लेख केला. सरकार लघु उद्योगांना सक्षम बनवण्यावर सरकार भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधांची मजबूत परिसंस्था तयार करत असल्याचं ते म्हणाले. या परिषदेत अन्न सुरक्षा, गुणवत्ता मानकं यासारख्या मुद्द्यांवर तसंच अन्न सुरक्षा वाढवणे, अन्नाची नासाडी कमी करणे यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या चार दिवसीय परिषदेची सुरुवात आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं झाली. यामध्ये ९० हून अधिक देश, २६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेश सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते वर्धा इथं पीएम विश्वकर्मा कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्ज वाटप करतील. या योजनेच्या एक वर्षाच्या यशस्वी पूर्ततेसाठी ते पोस्टाच्या तिकिटाचं अनावरणही करणार आहेत.

त्यानंतर ते अमरावती इथं पीएम मित्रा अर्थात पीएम मेगा इंटेग्रेटेड टेक्स्टाईल रिजन्स अँड ऍपरल पार्कची पायाभरणी करतील. या एक हजार एकरवर

पसरलेल्या पार्कची निर्मिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे. केंद्र सरकारने वस्त्रोद्योगासाठी सात पीएम मित्रा पार्कला मान्यता दिली आहे.

प्रधानमंत्री मोदी राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन करणार आहेत. १५ ते ४५ वयोगटातल्या तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी, रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरातल्या नामांकित महाविद्यालयामध्ये ही केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. त्यानंतर प्रधानमंत्री पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचंही अनावरण करणार आहेत.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचं कल्याण ही केंद्र सरकारची प्राथमिकता आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. केंद्र सरकारला शंभर दिवस पूर्ण झाल्याबद्दल ते वार्ताहरांशी बोलत होते. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत देशभरातल्या शेतकऱ्यांना २१ हजार कोटी रुपयांच्या मदतीचं वाटप करण्यात आलं, याचा लाभ ९ कोटी ५१ लाख शेतकऱ्यांना झाला असं चौहान म्हणाले. शेतकऱ्यांना किफायतशीर दर देण्यासाठी आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवण्यासाठी पीएम आशा योजना सुरू करण्यात आली आहे, सरकारने डिजिटल ॲग्रीकल्चर मिशनलाही मंजुरी दिली आहे, असं चौहान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईमध्ये डीप क्लिन ड्राईव्हच्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू असून यामुळे मुंबईचं प्रदुषण कमी झालं असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. 'स्वच्छता ही सेवा' या राज्यस्तरीय अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत गिरगाव चौपाटीवरून झाली. हे अभियान २ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातल्या नागरी आणि ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. तसंच, 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांअंतर्गत वृक्षारोपण आणि सौंदयीकरण करण्याचे काम सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

पनवेल महापालिकेनं चारही प्रभागात कचऱ्याची साठवण केलेल्या दुर्लक्षित ठिकाणी स्वच्छतेचं नियोजन केलं आहे. यासाठी आत्तापर्यंत राबवलेल्या मोहिमेत पाच हजारापेक्षा जास्त नागरिकांनी सहभा देत २४ टनापेक्षा जास्त कचरा गोळा केला. **चंद्रपुरात**ही महापालिका क्षेत्रातून स्वच्छता अभियानाला सुरुवात केली गेली. त्याअंतर्गत जटपुरा गेट ते रामाळा तलावापर्यंत सफाई मोहीम राबवली गेली. प्रशासनानं गर्दीची ठिकाणं,बगीचं आणि सार्वजनिक जागांची स्वच्छता करण्याचं नियोजन केलं आहे. **अकोल्या**त जिल्हाभरातल्या ८०० ग्रामपंचायतींनी स्वच्छता मोहीमेअंतर्गत विविध उपक्रम राबवायला सुरुवात केली. अकोला जिल्हापरिषेत सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी आणि त्यांना डीग्निटी कार्डाचं वितरण करून या अभियानाला सुरुवात केली गेली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छताविषयक जनजागृतीपर पथनाट्यही सादर

केलं. बोरीवलीतल्या आकाशवाणी कर्मचारी वसाहतीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एक पेड मां के नाम ही मोहीम राबवत वृक्षारोपण केलं.

**नवी मुंबईत** स्वच्छता ही सेवा पंधरवड्याची सुरुवात कालपासून करण्यात आली. **पालघर** जिल्ह्यातही काल स्वच्छतेची शपथ घेऊन जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बिरवाडी आणि उमरोळी भागात मंदिर परिसराची स्वच्छता केली.

अनंत चतुर्दशीनीनंतर निर्माण झालेली अस्वच्छता दूर करण्यासाठी स्वच्छता अभियानात **नंदूरबार**मध्ये आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या उपस्थितीत काल शिवण नदीवर श्रमदान झालं.

**<><><><><>**

बुलडाणा इथं आज छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह बुलढाणा शहरात २६ स्मारकांचं लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत झालं. त्यानंतर मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान मेळाव्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

महायुती सरकारच्या उदासीनतेमुळे महाराष्ट्रात येणारा सौर ऊर्जा प्रकल्प अन्य राज्यात गेला असा आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. समाज माध्यमावरील आपल्या संदेशात त्यांनी नागपुरात येणारा १८ हजार कोटीं रुपये गुंतवणुकीचा हा प्रकल्प गुजरातला गेल्याचं नमुद केलं आहे. महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणे कठीण झाले आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकी फेडरल रिझर्व्हनं ४ वर्षानंतर पहिल्यांच व्याजदरात कपात केली आहे. बँकेनं त्यांच्या व्याजदरात अर्धा टक्क्याची कपात करुन हा दर पावणे ५ ते ५ टक्क्यांच्या दरम्यान नेला आहे. फेडरल ओपन मार्केट समितीच्या २ दिवस चाललेल्या बैठकीनंतर अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी हा निर्णय जाहीर केला. महागाई आटोक्यात आल्यानं आणि बेरोजगारीची भीती वाढल्यानं ही कपात आवश्यक असल्याचं पॉवेल म्हणाले. व्याजदरात अपेक्षेपेक्षा अधिक कपात झाल्यानं जगभरातले शेअर बाजार तेजीत होते. भारतीय शेअर बाजारांनीही आज व्यवहार सुरू झाल्यानंतर विक्रमी पातळीला स्पर्श केला होता.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी केलेल्या कामाबद्दल ‘वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरम’कडून जागतिक

कृषी पुरस्कारानं  काल सन्मानित करण्यात आलं. मुंबईत एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.  जागतिक बांबू दिनाच्या औचित्यानं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

भारतानं २०३० पर्यंत ३०० मेट्रिक टन पोलाद क्षमता गाठण्याचं उद्दिष्ट ठेवलं असल्याचं केंद्रीय पोलाद आणि अवजड उद्योग मंत्री एच डी कुमारस्वामी यांनी म्हटलं आहे. पोलादातील हरितक्रांती आणि शाश्वत नवोन्मेषता या विषयावर मुंबईत आयोजित ३६ व्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. राष्ट्रीय पोलाद धोरण हे हरित परिवर्तनासाठी महत्त्वाचं असून हे धोरण हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर आणि संपूर्ण उद्योगात कार्बन फूटप्रिंट कमी करण्यावर भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी भारतीय पोलाद क्षेत्रावरील हँडबुकचं प्रकाशन करण्यात आलं. तसंच पोलाद क्षेत्रातल्या कंपन्यांना यावेळी पुरस्कार देण्यात आले.

**<><><><><>**

अकोल्यात गणेश विसर्जन मिरवणुकीत झालेल्या गदारोळानंतर परिस्थिती नियंत्रणात आहे. मिरवणुकीत जखमी झालेल्या ११ पैकी दोघांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. इतर जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आलं. याप्रकरणी पोलिसांनी ६८ जणांना ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

धुळे शहरात एकाच कुटुंबातल्या चौघा जणांनी आत्महत्या केली आहे. पती, पत्नी आणि त्यांच्या दोन मुलांचा यात समावेश आहे. विषारी औषध पिऊन ही आत्महत्या केल्याचं सांगितलं जात आहे. आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट असून पोलीस तपास सुरू आहे.

<><><><><>

अकोल्यात गणेश विसर्जन मिरवणुकीत झालेल्या गदारोळानंतर परिस्थिती नियंत्रणात आहे. मिरवणुकीत जखमी झालेल्या ११ पैकी दोघांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. इतर जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आलं. याप्रकरणी पोलिसांनी ६८ जणांना ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

बांग्लादेशाविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची खराब सुरुवात झाली. चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर हा सामना सुरू आहे. बांगलादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं बातमी हाती आलं तेव्हा भारताच्या ५४ षटकात ६ गडी बाद २०९ धावा झाल्या होत्या. ६ पैकी ३ फलंदाज १० पेक्षा कमी धावांवर बाद झाले. यात विराट कोहली, रोहित शर्मा, शुभमन गिल या दिग्गजांचा सहभाग आहे. यशस्वी जयस्वाल ५६, रिषभ पंत ३९ आणि के एल राहुल १६ धावांवर बाद झाले.

हसन महमूदनं ४१ धावात चार गडी टिपले. गौतम गंभीर भारतीय संघाचा प्रशिक्षक झाल्यानंतर भारताची ही पहिलीच कसोटी मालिका आहे.

**<><><><><>**

मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**